निवडणूक आयोगाने केली मतदार यादी अद्ययावत

एक कोटी मतदार वाढणार

लखनौ, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. उत्तरप्रदेशात 2017 च्या तुलनेते 2022 च्या विधानसभा निवडणुकीत एक कोटी मतदार वाढणार आहे. मागील विधानसभा निवडणुकीत एकूण 14.16 कोटी मतदार होते. तर पुढील वर्षी 2022 मध्ये होणाऱ्या निवडणुकीत 15 कोटी अधिक मतदार होणार आहे. मतदार संक्षिप्त पुनरीक्षण अभियानाद्वारे एक नोव्हेंबर 2021 रोजी जाहीर करण्यात आलेल्या अंतिम मतदार यादीत 14.71 कोटी मतदार होते. अभियानादरम्याने सुमारे 74 लाख अर्ज आले आहेत. यातही नवीन मतदार होण्यासाठी सुमारे 52 लाख अर्ज प्राप्त झाले होते. मतदार यादीचे अंतिम प्रकाशन पाच जाजेवारी रोजी करण्यात येणार आहे. उत्तरप्रदेशात 2022 च्या विधासभा निवडणुकीच्या तयारीला लागलेल्या निवडणूक आयोगाने एक जानेवारी 2022 ला 18 वर्षे पूर्ण होणाऱ्या तरुणांना मतदार करणे आणि सध्याच्या मतदारांच्या नावांतील कोणत्याही प्रकारातील त्रुटी दूर करण्यासाठी मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण अभियान राबविण्यात आले होते. या मोहिमेतून निधन झालेल्या मतदारांची नावेही हटविण्यात आली आहेत. एक नोव्हेंबर रोजी प्रकाशित अंतिम मतदार यादीत एकूण 14.71 कोटी मतदार होते. यात 7.92 कोटी पुरुष व 6.79 कोटी महिलांचा समावेश आहे. तृतीयपंथीयांची संख्या 7833 एवढी होती.

अखिलेशच सपाचे नवे नेताजी

समाजवादी पक्षाचे नवीन नेताजी हे अखिलेश यादव असून आपणही आता या निष्कर्षावर पोहोचलो असल्याचे प्रसपा अध्यक्ष शिवपाल यादव यांनी म्हटले आहे. उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर सपा आणि प्रसपा दरम्यान तिकीटवाटप निश्चित होणार आहे. आपल्या पक्षातील विजयी होणाऱ्या उमेदवारांना तिकीट वाटप करण्यात यावे, अशी इच्छा असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात सपा पुन्हा सत्तेत यावे, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. सपा प्रमुख अखिलेश यादव आणि प्रगतिशील समाजवादी पार्टी अध्यक्ष शिवपाल यादव यांच्यातील वैमनस्य संपले आहे. काका-पुतण्यामध्ये आघाडी झाली आहे. सोबत निवडणूक लढविण्यासोबतच अखिलेश यादव यांना मुख्यमंत्री बनविण्याची सुपारीही शिवपाल यादव यांनी घेतली आहे.

उत्तर प्रदेश
विधानसभा निवडणूक

प्रियांका यांच्या प्रचाराने भाजपा अस्वस्थ

काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी उत्तर प्रदेश निवडणुकीसाठी ज्या पद्धतीने महिला मतदारांची जमवाजमव करीत आहेत, त्याने भाजपामध्ये घबराट निर्माण झाली आहे, याला योगी आदित्यनाथ मंत्रिमंडळातील एका मंत्र्यांनीच दुजोरा दिला आहे. भाजपाही यादृष्टीने प्रयत्न करीत आहे. मागच्या निवडणुकीत महिला मतदारांनी भाजपला जोरदार पाठिंबा दिला होता, असे सांगताना या मंत्र्यांनी दबक्या आवाजात मान्य केले की, प्रियंका गांधी राज्यातील महिला मतदारांत स्थान निर्माण करण्यात यशस्वी होताना दिसत आहेत.

अल्लाह व मल्लाहच भाजपाला तारणार

अल्लाह व मल्लाहच शिवाय भाजपाला कोणीच वाचवू शकणार नाही, अशी टिप्पणी समाजवादी पार्टी ओबीसी मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष राजपाल कश्यप यांनी म्हटले आहे. वर अल्लाह आणि खाली मल्लाह यांनी ठरविले तर भाजपाला कोणीच वाचवू शकत नाही. सपाच्या सभांना मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद बघता आयकर विभागाद्वारे धाडी टाकण्यात येत आहे. परंतु जनतेला बदल हवा आहे आणि कामगार आणि शेतकरी बदला घेणार असून सपाचे सरकार येणार असल्याचे सपाचे आमदार अभय सिंग यांनी म्हटले आहे. यावेळी गोसाईगंजचे भाजपा आमदार इंद्रप्रताप तिवारी उर्फ खब्बू तिवारी यांच्यावरील उच्चन्यायालयाच्या निकालावरून अभय सिंग यांनी टीका केली. विशेष म्हणजे इंद्रप्रताप तिवारी उर्फ खब्बू तिवारी यांच्यापेक्षा अधिक खटले स्वतः अभय सिंग यांच्या नावावर दाखल आहेत.

फोन टेपिंगच्या आरोपांची होणार चौकशी

समाजवादी पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव आणि काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वाड्रा यांनी राज्य सरकारवर फोन टॅपिंगचे आरोप केले आहेत. त्यांच्या या आरोपांची माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयातफे चौकशी करण्यात येणार आहे. प्रियंका गांधी यांनी आपल्या मुलांचे इंस्टाग्राम खाते हॅक केले असल्याचे म्हटले होते.

तृणमूल काँग्रेस शर्यतीत नाही

अरविंद केजरीवाल यांची टीका

पणजी. गोव्यात विधानसभा निवडणूक लढण्यासाठी तृणमूल काँग्रेसकडून सध्या जोरदार तयारी सुरु आहे. दरम्यान आम आदमी पक्षाचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी तृणमूल काँग्रेस स्पर्धेत कुठेच नसल्याचे म्हटले आहे. तुम्ही लोक तृणमूल काँग्रेसला जास्तच महत्व देत आहात. त्यांच्याकडे सध्या 1 टक्के मतेही नाहीत. फक्त तीन महिन्यांपूर्वी ते गोव्यात आले आहेत. लोकशाहीत असे चालत नाही. तुम्हाला परिश्रम घ्यावे लागतात, लोकांमध्ये काम करावे लागते, असे ते म्हणाले.

भ्रष्टाचारमुक्त सरकार देणार

गोव्यात भ्रष्टाचारमुक्त सरकार देऊ असे आश्वासन दिले. यावेळी त्यांनी दिल्लीमधील आपल्या कामाचा उल्लेख केला. आम आदमी पक्षाने दिल्लीमधील भ्रष्टाचार संपवला, असे त्यांनी सांगितले. यावेळी गोव्यातील भाजपा सरकारवर निशाणा साधत अनेक मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप असल्याचे म्हटले. काँग्रेस, भाजपा सर्वच पक्ष भ्रष्टाचारी असल्याने गोव्यातील लोकांनी काही पर्याय नव्हता. पण आता आम आदमीसारखा स्वच्छ पक्ष आला आहे, त्याला संधी द्या, असे आवाहन केजरीवालांनी केले.

जे. पी. नड्डांचा विरोधकांवर निशाणा

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी विरोधी पक्षांच्या नेत्यांवर टीका केली. गोव्यात येणाऱ्या नेत्यांनी बॅनरबाजी करून जनतेला भरकटविण्याचे काम केल. ज्यांनी लसीकरणाच्या फायद्यांबद्दल इतरांची दिशाभूल करण्याच्या प्रयत्नात कोविड लसीच्या डोसला मोदी टीका किंवा भाजप का टिका म्हटले. आता मी त्या लोकांना विचारतो, कसा होता मोदी टिका, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाना साधला. गोव्यात 100 लसीकरण झाले याबद्दल गोवा सरकारचे आणि मुख्यमंत्री सावंत यांचे कौतूक केले. भाजपा सरकारच्या सगळ्या योजना लोकहिताच्या आहेत हे पुन्हा सिद्ध झाले म्हणत. दयानंद स्वास्थ सेवा योजने अंतर्गत गोवेकरांना सरकारने केलेल्या मदतीची प्रशंसा त्यांनी यावेळी केली. ते गोव्यात एका जाहीर सभेला संबोधित करताना ते बोलत होते. गोव्यातील गुन्ह्यांचे प्रमाण 101 टक्क्यांनी कमी झाले असून, गुन्हे अन्वेशन विभागाला 93 टक्के यश आले आहे.

भाजपा आमदाराचा राजीनामा

पंतप्रधान नरेंद्र मोदी गोव्यात असेपर्यंत कोणा भाजपा आमदाराने राजीनामा देऊ नये, असे नेत्यांना वाटत होते आणि त्याप्रमाणे घडलेही. परंतु पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांना मात्र कार्लुस आल्मेदा यांनी राजीनामा दिलेला पहावा लागला. परंतु त्यांना एकमेव समाधान लाभले असेल, ते म्हणजे काँग्रेसचा पाया रेजिनाल्ड लॉरेन्स यांच्या रूपाने खचला. कार्लुस आल्मेदा आतातरी काँग्रेस किंवा तृणमूल या पक्षांमध्ये जाऊ पाहत असले, तरी भाजपाने तेथे ठरवून त्यांचा काटा काढला आहे. ते आजारी आहेत आणि त्यांना चालताही धड येत नाही, त्यामुळे मतदार त्यांना जवळ करणार नाहीत, असा भाजपाचा कयास आहे. परंतु मनाने पेटलेला नेता आजारी असतानाही लोकांना जागवू शकतो आणि भल्याभल्यांना धोबीपछाड देऊ शकतो. राजकारणात कित्येक पावसाळे पाहिलेल्या नड्डा यांना ही गोष्ट माहीत नाही असे नाही.

राणा गुरमितसिंग सोधी भाजपात

पंजाबमध्ये काँग्रेसला धक्का

चंदीगड. पंजाबमध्ये विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून माजी मंत्री राणा गुरमितसिंग सोधी यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली. पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या उपस्थितीत त्यांनी आज दिल्लीत कमळ हाती घेतले. राणा सोधी हे माजी मुख्यमंत्री अमरिंदर सिंग यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. अमरिंदरसिंग यांची मुख्यमंत्रिपदावरून उचलबांगडी होताच सोधी यांचीही मंत्रिमंडळातून हकालपट्टी झाली होती. अमरिंदरसिंग यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यानंतर सोधी हे काँग्रेस सोडणारे दुसरे मोठे नेते ठरले आहेत. ते आता फिरोझपूरमध्ये भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवू शकतात अशी माहिती सूत्रांनी दिली. अमरिंदर यांच्या सल्ल्यानेच सोधी यांनी भाजपामध्ये प्रवेश केला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. काँग्रेसच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांना लिहिलेल्या पत्रामध्ये सोधी यांनी म्हटले आहे की, पंजाब काँग्रेसमधील अंतर्गत संघर्षाला वैतागून पक्ष सोडत आहोत.

निवडणुकीसाठी कॅप्टननी केल्या नियुक्त्या

पंजाबचे माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदर सिंह यांनी विधानसभा निवडणुका गंभीरतेने घेतल्या असून विजयाची रणनीती त्यांनी आखली आहे. त्यामुळे त्यांनी पंजाब लोक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी नियुक्ती त्यांनी केली असल्याची माहिती पक्षाचे महासचिव कमल सैनी यांनी दिली. राजीव दुग्गल यांना पक्षाचे उपाध्यक्ष आणि राजीव भगत यांना अमृतसर शहर प्रमुख नेमले आहे. राजवंत कौर यांना महिला आघाडीच्या कार्यकारी अध्यक्ष, अजय कपूर महासचिव, हरमेश कुमार गोयल यांना पटियाला ग्रामीण जिल्हाध्यक्ष नियुक्त केले आहे.

फोटोपुरती मैत्री

इम्रान खानसोबतची सिद्धूची मैत्री केवळ फोटो काढण्यापुरतीच मर्यादित आहे का, असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. नारायण मंदिरात पूजा होत असताना गुंडांनी आतमध्ये प्रवेश करून तोडफोड केली. यावेळी उपस्थित असलेले पोलिस मूकदर्शक बनले होते. यापूर्वी रावळपिंडीमध्ये 100 वर्षे प्राचीन हिंदू मंदिराची जेहादींनी तोडफोड केली होती. परंतु पाकिस्तानने काहीच कारवाई केली नाही.

आपच्या आमदारावर हल्ला

पंजाबमधील गढशंकर विधानसभा मतदारसंघातील आपचे आमदारर जयकृष्ण सिंह रोड़ी यांच्यावर कारमध्ये आलेल्या सशस्त्र हल्लेखोरांनी हल्ला केला. यामुळे त्यांच्या गाडीचे काच फुटले. कारमध्ये आमदार जयकृष्ण होते. या जीवघेण्या हल्ल्यातून ते थोडक्यात बचावले. मंगळवारी रात्री साडेअकरा वाजता कारमधून आपल्या घरी परत येत असताना निरंकारी भवनाजवळ एका कारने आपल्या कारला धडक मारली. यावेळी कारमधून आलेल्या गुंडांनी सशस्त्र हल्ला केला. यामुळे त्यांच्या गाडीचे काच फुटले, असे आप आमदार जयकृष्ण सिंह रोडी यांनी सांगितले. याप्रकरणी गढ़शंकर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

चुघ यांचा सिद्धू व इमरानच्या मैत्रीवर टोला

पाकिस्तानमध्ये वारंवार हिंदू मंदिरांवर होणाऱ्या हल्ल्याच्या घटनांवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नवज्योत सिद्धू यांच्या मौनावर भाजपाचे राष्ट्रीय महासचिव तरुण चुघ यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. पाकमधील धार्मिक दहशतवादामुळे हिंदूमध्ये भीती पसरली आहे. एका आठवड्यात झालेल्या या घटनेवर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. 2 गुंडांनी कराचीमधील नारायण मंदिरात तोड़फोड़ केली आणि मंदिरातील मूर्तींना नुकसान पोहोचविले. या घटनांची दखल घेत सिद्धू आपल्या मित्र असलेल्या पाकिस्तानच्या पंतप्रधान इम्रान खानला हस्तक्षेप करण्यास का सांगत नसल्याचे चुघ यांनी म्हटले आहे.

पंजाब
विधानसभा निवडणूक

बसपाच्या निर्णयाने काँग्रेसमध्ये उत्साह

तराई क्षेत्रात मिळणार फायदा

डेहराडून. पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीचा पारा वाढत आहे. निवडणूक तारखेच्या औपचारिक घोषणेपूर्वीच सर्व पक्ष जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु बहुजन समाज पार्टीने अद्याप निवडणूक रिंगणात उडी घेतली नाही. उत्तराखंडमध्ये बसपाच्या अल्प सक्रियतेने काँग्रेस आपल्या यशाचे गणित लावताना दिसत आहे. कारण राज्याच्या तराई क्षेत्रात बसपा काँग्रेसची वाट बिकट करू शकते. उत्तराखंडमध्ये काँग्रेस आणि भाजपानंतर बसपा तिसरी शक्ती आहे. तराई क्षेत्रात दलित आणि अल्पसंख्यांक मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे काँग्रेस, बसपा आणि सपा हे सर्व या क्षेत्रातून आपले भाग्य आजमावत असतात. या पक्षांच्या आपसातील लढाईचा फायदा भाजपाला मिळत असतो. परंतु यावेळी चित्र काहीसे वेगळे आहे. निवडणुकीचे तापमान वाढत असतानाही बसपाने अद्याप निवडणूक रिंगणात उडी घेतली असल्याचे दिसत नाही. हरिद्वार आणि उधमसिंगनगरातील 16 विधानसभा जागांवर बसपाचे वर्चस्व आहे. 2002 च्या निवडणुकीत बसपा तराई क्षेत्रातून सात आणि 2007 मध्ये आठ जागा जिंकल्या आहे. वास्तविक 2012 च्या निवडणुकीत बसपाला केवळ तीन जागा मिळाल्या होत्या. परंतु त्यांच्या मतांची टक्केवारी 12 पर्यंत वाढली होती. परंतु 2017 मध्ये घटून ही सात टक्के राहिली होती.

काँग्रेसला फायदा

या निवडणुकीत बसपा सक्रिय नसल्याने काँग्रेसला फायदा होणार आहे. कारण यावेळी काँग्रेस आणि भाजपाचा थेट सामना होणार आहे. हरिद्वार आणि उधमसिंहनगरामुध्ये दलित आणि अल्पसंख्यांक मतदारांची संख्या बरीच आहे. त्यामुळे पक्षाला आघाडी मिळू शकते, असे एका काँग्रेस नेत्याने म्हटले आहे.

दलित मुख्यमंत्री होणार?

उत्तराखंड
विधानसभा निवडणूक

तराई क्षेत्रातील बसपाचा प्रभाव कमी करण्यासाठी काँग्रेसने पंजाबचे मुख्यमंत्री चरणजीत सिंग चन्नी यांच्याप्रमाणे दलित मुख्यमंत्री केल्या जाऊ शकतो, असे संकेत काँग्रेसने दिले आहे. उत्तराखंडमध्ये अनुसूचित जातीची संख्या सुमारे 18 टक्के आहे. यातील जास्त तराई क्षेत्रात आहे. चन्नी यांना पंजाबचे मुख्यमंत्री केल्यानंतर दलितांचा काँग्रेसवर विश्वास वाढला आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत त्याचा फायदा मिळू शकतो.

हिंदू आणि हिंदुत्व एकच

दिल्ली. हिंदू आणि हिंदुत्व वेगळे नाही असे सुरेश भैय्याजी जोशी यांनी स्पष्ट केले असून हिंदू आणि हिंदुत्ववादी यांच्यातील भेद सांगत भ्रम निर्माण करणाऱ्या राहुल गांधी यांच्यावर नाव न घेता टीका केली. हिंदुत्ववादी गंगेत एकटाच स्नान करतो. हिंदू करोडो लोकांसह गंगेत स्नान करतात. एक बाजू हिंदू, तर दुसरी बाजू हिंदुत्ववादी. एक बाजू खरी, दुसरी बाजू खोटी. हिंदू खरे बोलतात, हिंदुत्ववादी खोटे बोलतात, असे वक्तव्य राहुल गांधींनी केले होते. पंतप्रधान मोदींनी गेल्या आठवड्यात काशी विश्वनाथ कॉरिडॉरचे उद्घाटन करताना गंगेत स्नान केले होते. त्यावरून त्यांनी टीका केली होती. यापूर्वी जयपूरमधील 'महागाई हटाओ रॅली'मध्ये हिंदूविरुद्ध हिंदुत्व या मुद्द्यावरून भाजपा सरकारला त्यांनी घेरले होते. या प्रकरणावर भाष्य करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते सुरेश भैय्याजी जोशी यांनी राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला आहे. ज्यांना हे विधान योग्य वाटते त्यांना ते नाकारण्याचे कोणतेही कारण सापडणार नाही. 'हिंदू' आणि 'हिंदुत्व' या दोन वेगळ्या कल्पना नाहीत. ते समान आहेत.

धर्मनिरपेक्षतेचा ठेका काँग्रेसकडे

दिल्ली. प्रशांत किशोर हे अलिकडे काँग्रेसवर फार नाराज असल्याचे त्यांच्या वक्तव्यांवरून दिसतंय. प्रशांत किशोर काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा मध्यंतरी चांगल्याच रंगल्या होत्या. किशोर यांनीदेखील प्रियंका आणि राहुल गांधींची भेट घेतली होती. त्यावरून ते लवकरच काँग्रेसमध्ये सामील होणार, असे वाटत होते. पण हे न घडता अचानक प्रशांत किशोर यांनी काँग्रेसविरोधात वक्तव्ये करायला सुरुवात केली. आता पुन्हा एकदा त्यांनी काँग्रेसवर निशाणा साधला आहे. त्यांनी काँग्रेसच्या धर्मनिरपेक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. हे विचित्र आहे की काँग्रेस लढो अथवा न लढो, जिंको अथवा हारो पण भाजपाविरोधी जागा त्यांच्या मालकीची आहे. आणि जे भाजपाशी लढत आहेत, भाजपाला पराभूत करण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांचे काँग्रेससोबत पटत नाही, म्हणून ते भाजपाचे एजंट झाले आहेत. त्यामुळे ज्याप्रमाणे देशात राष्ट्रवादाचे प्रमाणपत्र देण्याचा ठेका भाजपाने घेतला आहे, त्याचप्रमाणे देशात मोदीविरोधी आणि धर्मनिरपेक्षतेचे प्रमाणपत्र देण्याचा नवा ठेका काँग्रेसने घेतला आहे. काँग्रेसने निवडणूक लढवून भाजपाचा पराभव केला पाहिजे. तुम्ही निवडणूक लढवा. तुम्ही 60-70 टक्के जागांवर भाजपाशी लढत आहात, त्यांना पराभूत करा, तुम्ही बाकी लोकांच्या फंदात का पडत आहात, असे ते म्हणाले. अलीकडच्या काळात प्रशांत किशोर यांनी काँग्रेस किंवा काँग्रेस नेतृत्वावर निशाणा साधण्याची ही पहिलीच वेळ नाही.

# QUICK NEWS

तृतीयपंथीयांची होणार पोलिसांत भरती

बंगळुरू. कर्नाटक सरकारने प्रथमच राज्य पोलिस खात्यातील भरतीसाठी तृतीयपंथी उमेदवारांकडून अर्ज मागविले आहेत. कर्नाटक नागरी सेवा (सामान्य भरती) नियमाच्या दुरुस्तीनुसार तृतीयपंथीयांना एक टक्का नोकऱ्या उपलब्ध करून देण्यासाठी कर्नाटक पोलिस विभागाने विविध पदांसाठी अर्ज मागविले आहेत. अलीकडेच जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार, कर्नाटक राज्य राखीव पोलिस दलात विशेष राखीव उपनिरीक्षकाची चार पदे आणि भारतीय राखीव बटालियनमध्ये एक पद राखीव असेल.

गायींची थट्टा करण्याचे धाडस करू नका

चेन्नई . उत्तर प्रदेशातील वाराणसीपासून तामिळनाडूतील वाडीपट्टीपर्यंत भारतात पवित्र गायी चरतात. त्यांची कोणीही थट्टा उडवण्याचे धाडस करता येणार नाही, असे मद्रास उच्च न्यायालयाने म्हटले आहे. तसेच संविधानामध्ये हसण्याच्या अधिकारामध्ये कदाचित सुधारणा करण्याची गरज आहे, असा उपरोधिक टोलाही देखील न्यायालयाने लगावला. एका गंमतीशीर फेसबुक पोस्टवरून पोलिसांनी अतिगंभीर कलमाखाली दाखल केलेला गुन्हा रद्द करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले.

कोणावर हसायचे हा गंभीर प्रश्न

एका व्यक्तीने फेसबुकवर काही फोटो टाकत नेमबाजीसाठी सिरुमलाईची यात्रा असे कॅप्शन दिले होते. त्यामुळे त्याच्याविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा रद्द करताना हे उदाहरण दिले. कोणावर हसायचे हा गंभीर प्रश्न आहे. कारण विनोद करणे आणि चेष्टा करणे यात फरक आहे. विनोदी असणे आणि इतरांची चेष्टा करणे या दोन भिन्न गोष्टी आहेत.

तृतीयपंथीयांचा रास्तारोको

24 तासांत दोघांची हत्या

पाटणा. गेल्या 24 तासांत दोघा तृतीयपंथीयांची हत्या करण्यात आल्याने संतप्त तृतीयपंथीयांनी एकत्र येत रास्तारोको आंदोलन केले. धक्कादायक बाब म्हणजे यातील एका तृतीयपंथीची मंगळवारी सकाळीच गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी सखोल चौकशी करून तातडीने आरोपींना अटक शिक्षा केली जावी, अशी मागणी केली आहे. पाटणाच्या कांकरबाग पोलिस ठाण्याच्या हद्दीत एक हत्या झाली. सनी नावाचा एक तृतीयपंथी सकाळी जखमी अवस्थेत एका पुलाखाली पडल्याचे आढळून आले होते. दरम्यान, त्याला रुग्णालात नेत असताना त्याचा मृत्यू झाला. आपल्या सहकाऱ्याच्या मृत्यूनंतर तृतीयपंथी समाजाने आक्रमक पवित्रा घेत आंदोलन केले. यावेळी करण्यात आलेल्या निदर्शनाला हिंसक वळणही लागले होते. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्जही करावा लागला होता.

वाद कशामुळे पेटला?

तृतीयपंथीच्या दाव्यानुसार त्यांच्या एका साथीदाराची गोळी घालून हत्या करण्यात आली. छातीत गोळी घालून एका तृतीयपंथीचा जीव घेण्यात आल्यानंतर तृतीयपंथी समाज आक्रमक झाला. या हत्येप्रकरणी एकाला ताब्यातही घेण्यात आले असून पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. छातीत गोळी लागल्याचे कळल्यानंतर जखमी तृतीयपंथीयाला जवळच्याच श्री राम रुग्णालयात उपचारासाठी नेले होते. मात्र उपचाराआधीच जखमी तृतीयपंथीचा मृत्यू झाला होता.

आणखी एका शहराचे होणार नामांतरण

दिल्ली, नवराष्ट्र ब्यूरो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पार्टीने पुन्हा एकदा हैदराबादच्या नामांतरणाचा मुद्दा उपस्थित केला आहे. नामांतरणाचा मुद्दा लक्षात घेत संघाने जानेवारी महिन्यामध्ये तीन दिवसीय बैठक हैदराबादमध्ये आयोजित केली आहे. जानेवारीच्या पहिल्याच आठवड्यात होणाऱ्या या बैठकीचे आयोजन करण्यात आले असून संघाशी संबंधित संस्थाना आमंत्रित करण्यात आले आहे. पुढील वर्षी म्हणजेच 2022 रोजी पाच राज्यांमध्ये होणाऱ्या निवडणुकांच्या तयारीसंदर्भातील चर्चा या बैठकीत केली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे या बैठकीची माहिती देताना आयोजन हैदराबादऐवजी भाग्यानगरमध्ये करण्यात आल्याचे संघाने म्हटले आहे.

जाहीर अधिसूचना

महत्त्वाच्या दुरुस्त्यांकरिता प्लॅटफॉर्म क्र. ४ वरील दादर जुन्या मध्यवर्ती पादचारी पुलाचा (एफओबी) भाग बंद ठेवण्यासंदर्भात

दादर जुन्या मध्यवर्ती एफओबीचे दुरुस्ती काम प्लॅटफॉम क्र. ४ वर निर्धारित करण्यात आले आहे. प्लॅटफॉर्म क्र. ४ वरील सदर एफओबीचे दक्षिण व उत्तर दिशेकडील जिने दि. २३/२४.१२.२०२१ रात्रीपासून २७.१२.२०२१ पर्यंत बंद राहतील. सदर कालावधीदरम्यान पूर्व व पश्चिम दिशांकडून प्लॅटफॉर्म क्र. ४ वरून सदर एफओबीवर प्रवेश नसेल. प्रवासी दादर स्थानकात प्लॅटफॉर्म क्र. ४ वरील अन्य दोन एफओबीज्चा वापर करू शकतील. होणाऱ्या गैरसोयीबद्दल दिलगीर आहोत.

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
आज़ादी का अमृत महोत्सव
617
आपकी सुरक्षा हमारा परम ध्येय

बृहन्मुंबई महानगरपालिका

वृक्ष प्राधिकरण

-जाहिर सूचना-

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार **परिमंडळ -१** मधील 'डी' विभागातील ०१ प्रस्ताव, **परिमंडळ-२** मधील 'एफ/उत्तर' विभागातील ०३ प्रस्ताव, 'जी/उत्तर' विभागातील ०२ प्रस्ताव म्हणजेच एकूण ०६ प्रस्ताव, म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधीकरण/वृक्ष प्राधिकरण समिती यांचा मंजुरीकरिता प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे/पुर्नरोपित करणेबाबत तपशील हा म.न.पा. च्या mcgm.gov.in - बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे १५९ - Adv - ७ days - z - I, II या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे नागरीकांना विनंती करण्यात येते की, सुनावणीसाठी उद्यान अधिक्षक कार्यालयात प्रत्यक्ष हजर न राहता, उपरोक्त प्रस्तावांविषयी आपले आक्षेप/सुचना उद्यान अधिक्षकांच्या sg.gardens@mcgm.gov.in या ईमेल आईडी वर दिनांक 3-1-22 पर्यंत पाठविण्यात याव्यात. तसेच विहित मुदतीत ई-मेल द्वारे सादर न झालेल्या आक्षेप/सूचनेचा विचार करण्यात येणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

उद्यान अधिक्षक यांचे कार्यालय,
पेंग्विन इमारत, २रा माळा,
वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
भायखळा (पूर्व) मुंबई- 400027.
दुरध्वनी क्र. २३७४२१६२
E.mail - sg.gardens@mcgm.gov.in

हस्ता/-
उद्यान अधीक्षक
व वृक्ष अधिकारी

पीआरओ/1841/विज्ञा./2021-22

जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते

kotak®

कोटक महिंद्र बँक लिमिटेड
कार्पोरेट आयडेंटिटी नं.. : एल६५११०एमएच१९८५पीएलसी०३८१३७)
नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी–२७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१. (महा.)
कॉर्पोरेट कार्यालय : कोटक इन्फिनिटी, झोन–२, ४ था मजला, बिल्डि.क्र. २१, इन्फिनिटी पार्क, ऑफ पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव, मुंबई–४०००९७.
शाखा /क्षेत्रीय कार्यालय : कोटक महिंद्र बँक लि. अदमास प्लाझा, ४ था मजला, सीएसटी रोड, कोलीवरी गाव, कुंची कर्वे मार्ग, कलिना, सांताक्रुझ (पू.), मुंबई – ४०० ०९८, महा.

ई–लिलाव तथा विक्रीकरिता जाहिर सूचना

तमाम जनतेस व विशेषत: कर्जदार/ सह–कर्जदार/ हमीदारांना याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण – प्रभारित खालील निर्देशित मालमत्ता जिचा **प्रतिकात्मक ताबा कोटक महिंद्र बँक लिमिटेड** प्रतिभूत धनको यांच्या **प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे** घेण्यात आला होता त्या मालमत्तांची **कोटक महिंद्र बँक लिमिटेड** खालील निर्देशित तारखेस **जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जी काही आहे तेथे आहे** तत्त्वावर विक्री करण्यात येत आहे. आमचे सेल्स अँड मार्केटिंग व ई–लिलाव सेवा भागीदार – **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** यांच्या वेबपोर्टलअर्थात www.c1india.com च्या माध्यमातून अधोहस्ताक्षरितांद्वारे स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ऑनलाइन प्रस्ताव मागविण्यात येत आहेत, ज्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

कर्जदार/हमीदार/गहाणवटदारांचे नाव	मागणी सूचना तारीख व रक्कम	स्थावर मालमत्तेचे विवरण
कर्ज खाते क्र. : आयएचएल४७६१५ **१) श्री. अशोक कुमार यादव** (कर्जदार) **२) श्रीमती शीला ए. यादव** (सह–कर्जदार)	**मागणी सूचना दिनांक** : २७.०७.२०२१ दि. २३.०७.२०२१ रोजीनुसार **रु. ६,१२,४४०.७१/–** (रु. सहा लाख बारा हजार चारशे चाळीस व एकाहत्तर पैसे मात्र)	**स्थावर मालमत्तेचा सर्व भाग व भूखंड** : फ्लॅट क्र. २०१, २ रा मजला, रश्मी रिजन्सी, ए विंग, न्यू लिंक रोड, वसई (पूर्व), जिल्हा ठाणे, महाराष्ट्र. **जमिनीचे क्षेत्र** : ४८९ चौ.फूट, **ताबा प्रकार : प्रतिकात्मक**

राखीव मूल्य	बोली रक्कमेच्या १०% इसारा रक्कम ठेव (इरठे)
रु. ३६,३०,०००/– (रु. छत्तीस लाख तीस हजार मात्र)	रु. ३,६३,०००/– (रु. तीन लाख त्रेसष्ट हजार मात्र)

स्थावर मालमत्तेच्या परिक्षणाची तारीख	लिलावाची तारीख व वेळ
दि. १६.०२.२०२२ रोजी स. ११.०० वा. ते दु. १२.०० वा.	दि. १८.०२.२०२२ रोजी दु. १२.०० ते दु. ३.०० वा.

प्रस्ताव/इरठे सादरीकरणाची अंतिम तारीख : दि. १८.०२.२०२२ रोजी दु. ३.०० पर्यंत

विक्रीच्या महत्त्वाच्या अटी व शर्ती :

१. लिलाव प्रक्रियेमध्ये विहित अनुसार बोली दस्तावेज यांच्या पुढील अटी व शर्ती यांच्या अनुसार आयोजित करण्यात येत आहे. बोलीदार आमचे सेल्स व मार्केटिंग व ई–लिलाव सर्व्हिस प्रदाते **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** अर्थात **wwhttps://www.bankeauctions.com** यांना बोली दस्तावेज, ऑनलाइन सादरीकरणाकरिताचा ई–लिलाव व बोली प्रपत्र यांच्यासाठी विहित प्रतिभूत संपत्तीचा तपशील जाणून घेण्याकरिता संपर्क साधावा. २. सर्व इच्छुक खरेदीदार/बोलीदार यांनी वरील निर्देशित वेब पोर्टल **https://www.bankeauctions.com** वर त्यांचे नाव नोंदणीकरण करणे आवश्यक आहे व त्यांचे युजर आयडी व पासवर्ड जनरेट करून ई–लिलावामध्ये सहभागी होण्याकरिता स्वत:चे नोंदणीकरण करणे आवश्यक आहे. ३. कोणतीही चौकशी, माहिती, सहाय्य, प्रक्रिया व ऑनलाइन ई–लिलावाचे प्रशिक्षण घेण्माकरिता प्रस्तावित बोलीदारांनी **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** विभाग यांना आमचे सेल्स अँड मार्केटिंग मेथे संपर्क साधावा व ई–लिलाव सर्व्हिस प्रदाते **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** यांना **मे. विनोद चौहान** यांच्या मार्फत **दूर. क्र. +९१ ७२९१९७११२४,२५,२६, मो. क्र. +९८१३८८७९३१ व ईमेल आमडी** : **delhi@c1india.com & support@bankeauctions.com** वर संपर्क साधावा. ४. प्राधिकृत अधिकारी यांची सर्वोत्तम माहिती व ज्ञानानुसार मालमत्तेवर कोणतेही भार नाहीत. तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेसंदर्भातील भार, हक्क आदींसंदर्भात तसेच मालमत्तेवर प्रभाव पाडणारे दावे/हक्क/देणी यांसंदर्भात स्वत:हून स्वतंत्र चौकशी तारीख व वेळेपर्यंत करावी. त्यांची पडताळणी करून खात्री करून घ्यावी. ई–लिलाव जाहिरात ही **केएमबीएल** बँकेची कोणतीही वचनबद्धता वा कोणत्याही सादरीकरणात स्थापित करीत नाही किंवा स्थापित करीत असल्याचे मानीत नाही. कोणतेही तिसऱ्या पक्षाचे कोणत्याही स्वरूपातील दावे/हक्क/देणी यांकरिता प्राधिकृत अधिकारी/प्रतिभूत धनको जबाबदार नसतील. ई–लिलाव जाहिरात **केएमबीएल** यांच्या कोणत्याही तक्रार तसेच कोणत्याही सादरीकरणाकरिता जबाबदार नसेल. प्राधिकृत अधिकारी/प्रतिभूत धनको कोणत्याही तिसरे पक्ष यांचे दावे/हक्क/ देणी यांकरिता कोणत्याही प्रकारे जबाबदार नसतील. ५. इच्छुक खरेदीदार/बोलीदारांनी वेबपोर्टल (https://www.bankeauctions.com) च्या माध्यमातून पॅन कार्ड, आधार कार्ड, रहिवासी पुरावा, कंपनीच्या संदर्भात बोर्ड ठराव तसेच पत्त्याचा पुरावा यांच्या स्व–साक्षांकित प्रतींसमवेता प्रतिभूत संपत्तीच्या व्याजरहित परतावायोग्य इसारा रक्कम ठेवीच्या (इरठे) **कोटक महिंद्रा बँक लि.**, या नावे जारी धनाकर्षाच्या स्वरूपातील प्रदानाचा तपशील सादर करावा/अपलोड करावा.

कर्जदार/गहाणवटदार/हमीदार यांना सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून तीस दिवसांच्या आत व्याज व खर्च यांच्यासह वरील निर्देशित थकबाकींच्या प्रदानाकरिता संपूर्ण दायित्वांवर सरफैसी कायद्याच्या **नियम ६(२), ८(६) व ९(१) अंतर्गत वैधानिक ३० दिवसांची** वैधानिक सूचना देण्यात येत आहे यात कसूर झाल्यास वरील निर्देशित अटी व शर्ती अनुसार प्रतिभूत मालमत्तेची विक्री करण्यात येईल. जर विक्री सूचनेमध्ये काही अडथळे असल्यास तसेच इंग्रजी व स्थानिक वृत्तपत्रामधील प्रसिद्धी दरम्यान काही अडथळे असल्यास सदर इंग्रजी आवृत्ती पाहावी व अंतिम प्रत म्हणून विचारात घ्यावी. जर कर्जदार/ हमीदार/ गहाणवटदार यांनी प्रतिभूत धनको यांचे थकित रक्कमेचे संपूर्ण प्रदान विक्रीच्या तारखेपूर्वी करावे व लिलाव रद्द करण्यात येईल.

विक्रीच्या अधिक माहिती अटी व शर्तीकरिता, कृपया आमच्या अधिकृत वेबसाइट **https://www.kotak.com/en/bank-auction.html** वर भेट द्या किंवा वरील दिलेल्या बँकेचे प्रादेशिक कार्यालय येथे **प्राधिकृत अधिकारी, श्री. समीर ठक्कर (मो.) ९८३३९४९८९९** यांच्याशी संपर्क साधावा.

विशेष निर्देश : **कोटक महिंद्र बँक लिमिटेड** (केएमबीएल) यांच्या वतीने आमचे सेवा प्रदाते **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** यांच्याद्वारे विहित तारखेस ई–लिलाव आयोजित करण्यात येईल ज्यावेळी बोरीदार राखीव मूल्याच्या वर त्यांच्या निवडीनुसार त्यांच्या घरातून/कार्यालयातून/जागेतून दर सादर करू शकतील. इंटरनेट कनेक्टिव्हिटी व अन्य आवश्यक बाबींची खात्री बोलीदारांनी स्वत:हून करावी. कृपया नोंद घ्यावी की इंटरनेट जोडणी खंडित होणे (कोणत्याही कारणास्तव) याची जबाबदारी बोलीदाराचीच असेल. कोणत्याही आकस्मिकपरिस्थितीसाठी **केएमबीएल** वा **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** हे जबाबदार नसतील. अशा आकस्मिक परिस्थितीकरिता बोलीदारांनी आवश्यक व्यवस्था/पर्याय तयार ठेवावेत जेणेकरून अशा परिस्थिती हाताळता येऊ शकतील व ई–लिलावात यशस्वीरीत्यासहभाग घेता येऊ शकेल. तथापि, बोलीदीरांनी अशी गुंतागुंतीची परिस्थिती टाळण्यासाठी अखेरच्या क्षणी त्यांची बोली दाखल करणे, सुधारित करणे टाळावे.

दिनांक : २३.१२.२०२१
ठिकाण : मुंबई, महाराष्ट्र

सही/– प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्र बँक लिमिटेडकरिता